ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत "स्वतंत्र गावच्या रुपये ७५ लाखा" पर्यंतच्या योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील "विभाग" जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करणे व त्यासाठी जिल्हा परिषदांच्या आस्थापनेवर पदे निर्माण करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१०००/ प्र.क्र. १०७ (६) / पा पु- ०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ नोव्हेंबर, २०००**

**वाचा :-** शासन अधिसूचना ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक : पंराज-१०००/ प्र.क्र. २५३/०६, दिनांक २४ ऑक्टोबर, २०००.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या पहिल्या अनुसूचीतील **"सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी"** शिर्षाखालील क्रमांक ५८ ते ६१ समोरील नोंदीनुसार "रु.१५ लाख पर्यंतच्या" ग्रामीण पाणी पुरवठयाच्या योजनांच्या बांधकामाची जबाबदारी तसेच सर्व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी जिल्हा परिषदांवर सोपविण्यात आली होती. संदर्भीय अधिसूचनान्वये **" स्वतंत्र गावच्या रु. ७५ लाखा पर्यंतच्या "** ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे बांधकाम व सर्व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात आली आहेत. या रकमेपर्यंतच्या योजनांची अंमलबजावणी करणे जिल्हा परिषदांना शक्य व्हावे यासाठी प्रत्येक जिल्हा परिषदांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या १९ जिल्हा परिषदेत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग कार्यरत आहेत त्यामुळे उर्वरित १४ (सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदुरबार, सांगली, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, वाशिम, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व गडचिरोली) जिल्हा परिषदांमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा विभाग कार्यान्वित करण्यासाठी १४ विभाग महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून जिल्हा परिषदेस उपलब्ध करुन देण्याची व त्यासाठी जिल्हा परिषदांच्या आस्थापनेवर आवश्यक पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.



३८९

**शासन निर्णयः**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन, संदर्भीय अधिसूचनेन्वये **"स्वतंत्र गावच्या रु. ७५ लाखा पर्यंतच्या"** ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे बांधकाम व सर्व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात आली असल्याने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे अतिरिक्त ठरलेल्या १४ विभागातील सोबतच्या **परिशिष्ट-१** मध्ये दर्शविलेली एकूण ४६२ पदे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन रद्द करण्यात येत आहेत.

२. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक ग्रापापु १०९८/प्र.क्र.१७३/पापु-०७, दिनांक ३ फेब्रुवारी, २००० अन्वये जिल्हा परिषदा अंतर्गत सध्या कार्यरत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचा ३५ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचा आकृतीबंध व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडून जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत होणाऱ्या विभागाचा आकृतीबंध समान रहावा यासाठी महाराष्ट्र जीवन प्रधाधिकरणाकडून हस्तांतरीत होणाऱ्या विभागातील **खाली दर्शविल्या प्रमाणे पदे प्रत्यार्पित करणे, नव्याने पदे निर्माण करणे, पदांचे पदनाम बदलणे व पदांचे उन्नतीकरण करणे यास शासन मंजुरी देत आहे.**

**अ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडील विभागाच्या आकृतीबंधानुसार मंजूर पदांमधून वरील प्रमाणे रद्द केलेल्या पदांपैकी जिल्हा परिषदेला आवश्यक नसलेली खालील पदे प्रत्यार्पित करण्यास शासन मंजुरी देत आहे.**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | म.जी.प्रा. च्या एका विभागासाठी मंजूर पदे | प्रत्यार्पित करावयाची एकूण पदे |
|---|---|---|---|---|
| १ | उप अभियंता (यांत्रिकी) | ८०००-१३५०० | ०१ | १४ |
| २ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | ५५००-९००० | ०१ | १४ |
| ३ | भांडारपाल | ४५००-७००० | ०१ | १४ |
| ४ | दप्तरी | २६१०-४००० | ०१ | १४ |

**ब) जिल्हा परिषदे कडील विभागासाठी मंजूर असलेल्या आकृतीबंधानुसार खालील पदे नव्याने मंजूर करण्यास शासन मंजुरी देत आहे.**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | जिल्हा परिषदेच्या एका विभागासाठी मंजूर पदे | जिल्हा परिषदेच्या आकृतीबंधानुसार कमी पडणारी पदे | नव्याने मंजूर करावयाची एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ सहाय्यक | ४०००-६००० | ५ | १ | १४ |
| २ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | ४०००-६००० | १ | १ | १४ |
| ३ | संगणक | ३०५०-४५९० | १ | १ | १४ |
| ४ | आरेखक | ४५००-७००० | १ | १ | १४ |

**क) जिल्हा परिषदेकडील विभागासाठी मंजूर असलेल्या आकृतीबंधानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील विभागातील पदांचे उन्नतीकरण करुन खालील पदांचे पदनाम बदलण्यास शासन मंजुरी देत आहे.**

| अ.क्र. | म.जी.प्रा.कडील पदांचे सध्याचे पदनाम व वेतनश्रेणी | | | उन्नतीकरणा नंतरचे पदनाम व वेतनश्रेणी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पदनाम | वेतनश्रेणी | एकूण पदे | पदनाम | वेतनश्रेणी | एकूण पदे |
| १ | विभागीय लेखापाल | ५०००-८००० | १४ | सहाय्यक लेखाधिकारी | ५५००-९००० | १४ |
| २ | प्रथम लिपिक | ५०००-८००० | १४ | कक्ष अधिकारी | ५५००-९००० | १४ |

**ड) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडील विभागातील मंजूर पदांचे पदनाम जिल्हा परिषदेकडील विभागाच्या मंजूर आकृतीबंधातील पदांनुसार करण्यास शासन मंजुरी देत आहे.**

| अ.क्र. | सध्याचे पदनाम | | | बदलावयाचे पदनाम | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पदनाम | वेतनश्रेणी | एकूण पदे | पदनाम | वेतनश्रेणी | एकूण पदे |
| १ | वरिष्ठ लिपिक | ४०००-६००० | ५६ | वरिष्ठ सहाय्यक | ४०००-६००० | ५६ |
| २ | कनिष्ठ लिपिक | ३०५०-४५९० | ११२ | कनिष्ठ सहाय्यक | ३०५०-४५९० | ११२ |
| ३ | सहाय्यक भांडारपाल | ३०५०-४५९० | १४ | भांडारपाल | ३०५०-४५९० | १४ |

३. संदर्भीय अधिसूचनेन्वये **"स्वतंत्र गावच्या रु. ७५ लाख पर्यंतच्या"** ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे बांधकाम व सर्व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात आले असल्याने, जिल्हा परिषदांकडे सोपविलेली कर्तव्ये आणि कार्य पार पाडणे त्यांना शक्य व्हावे यासाठी सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदुरबार, सांगली, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, वाशिम, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व गडचिरोली या जिल्हा परिषदांमध्ये प्रत्येकी १ या प्रमाणे **ग्रामीण पाणी पुरवठा विभाग निर्माण करण्यास शासन मंजूरी देत आहे. या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचा कर्मचारी आकृतीबंध सोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये नमूद केल्या नुसार ३३ पदांचा ठेवण्यास शासन मंजूरी देत आहे.** त्यानुसार परिशिष्ट-२ मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक ३३ पदे वरील १४ जिल्हा परिषदांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यास व त्यासाठीची **एकूण ४६२** पदे निर्माण करण्यांस शासन मंजूरी देत आहे.

४. जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यान्वित करण्यात आलेल्या या ग्रामीण पाणी पुरवठा विभागावर / उपविभागांवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे प्रशासकीय नियंत्रण राहिल. तर तांत्रिक नियंत्रण संबंधित अधिक्षक अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे राहिल. सर्व ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/ उप विभाग मंत्रालय स्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या नियंत्रणाखाली राहतील.

५. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित होणाऱ्या **या ४६२ पदांवरील वेतन व भत्यावरील मार्च २००१ पर्यंतचा** खर्च **महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात यावा.**



३९२

६. सन २००१-२००२ या आर्थिक वर्षापासून ४६२ पदांच्या वेतन व भत्यावरील खर्च खालील लेखाशिर्षांतर्गत करण्यात येणाऱ्या तरतूदी मधून भागविण्यात यावा.

१) राजपत्रित अधिकाऱ्यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा, ००१ प्रशासन व संचालन, पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय व उपविभागीय आस्थापना (२२१५ १८४३)

२) अराजपत्रित कर्मचा-यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च २२१५ पाणी पूरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा , १९१ स्थानिक संस्था, नगरपालिका इत्यादींना सहाय्य (पाच) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान (स्थानिक क्षेत्र) नियमित आस्थापना (२२१५ १८८१).

७. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९३१/ व्यय ३, दिनांक ४.११.२००० अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुधीर ठाकरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत.

मा. राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (सर्व ) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
सर्व विभागीय आयुक्त
सदस्य सचिव, (प्रशासन ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , मुंबई
सदस्य सचिव, (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
मुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई



३९३

सर्व उपमुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी लेखा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
संचालक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील सर्व विभाग
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवड नस्ती (पापु-०७)

# परिशिष्ट-१

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | गट | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | १४ | अ | १०६५०-१५, ८५० |
| २ | उपअभियंता (स्थापत्य) | १४ | ब | ८०००-१३, ५०० |
| ३ | उपअभियंता (यांत्रिकी) | १४ | ब | ८०००-१३, ५०० |
| ४ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ५६ | क | ५५००-९००० |
| ५ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | १४ | क | ५५००-९००० |
| ६ | विभागीय लेखापाल | १४ | क | ५०००-८००० |
| ७ | प्रथम लिपीक | १४ | क | ५०००-८००० |
| ८ | वरिष्ठ लिपीक | ५६ | क | ४०००-६००० |
| ९ | कनिष्ठ लिपीक | ११२ | क | ३०५०-४५९० |
| १० | भांडरपाल | १४ | क | ४५००-७००० |
| ११ | सहाय्यक भांडरपाल | १४ | क | ३०५०-४५९० |
| १२ | मुख्य आरेखक | १४ | क | ४०००-६००० |
| १३ | आरेखक | १४ | क | ३२००-४९०० |
| १४ | वाहनचालक | १४ | क | ३०५०-४५९० |
| १५ | शिपाई | ५६ | ड | २५५०-३२०० |
| १६ | दप्तरी | १४ | ड | २५५०-३२०० |
| १७ | चौकीदार | १४ | ड | २५५०-३२०० |
| | एकूण | ४६२ | | |



३८५

## परिशिष्ट-२

| अ.क्र. | पदनाम | विभागाचा कर्मचारी आकृतीबंध | पदसंख्या | गट | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | १ | १४ | अ | १०६५०-१५,८५० |
| २ | उपअभियंता (स्थापत्य) | १ | १४ | ब | ८०००-१३,५०० |
| ३ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ४ | ५६ | क | ५५००-९००० |
| ४ | सहाय्यक लेखा अधिकारी | १ | १४ | क | ५५००-९००० |
| ५ | कक्ष अधिकारी | १ | १४ | क | ५५००-९००० |
| ६ | वरिष्ठ सहाय्यक | ५ | ७० | क | ४०००-६००० |
| ७ | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | १ | १४ | क | ४०००-६००० |
| ८ | कनिष्ठ सहाय्यक | ८ | ११२ | क | ३०५०-४५९० |
| ९ | संगणक | १ | १४ | क | ३०५०-४५९० |
| १० | आरेखक | १ | १४ | क | ४५००-७००० |
| ११ | सहाय्यक आरेखक | १ | १४ | क | ४०००-६००० |
| १२ | भांडारपाल | १ | १४ | क | ३०५०-४५९० |
| १३ | अनुरेखक | १ | १४ | क | ३२००-४९०० |
| १४ | वाहनचालक | १ | १४ | क | ३०५०-४५९० |
| १५ | परिचर | ४ | ५६ | ड | २५५०-३२०० |
| १६ | चौकीदार | १ | १४ | ड | २५५०-३२०० |
| | एकूण | ३३ | ४६२ | | |



३९८